संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ‘त्या’ युध्दबंदींच्या नातेवाईकांची घालमेल

युध्द किंवा शेजारच्या देशाबरोबरच्या संघर्षाचे स्वरुप केवळ जयविजय एवढ्यापुरतेच मर्यादित नसते. त्याचे अनेक संदर्भ आणि कंगोरे अनेक वर्षे त्या त्या देशांना सोसावे लागतात. युध्द किंवा संघर्षानंतरच्या परिस्थितीतून मार्ग काढण्याचा तितकाच मोठा प्रयत्न गरजेचा ठरतो. ज्यावेळी शत्रूवर विजय मिळतो त्यावेळेला त्याचा अभिमान वाटणे ही स्वाभाविक गोष्ट असते. परंतु अशा अभिमानाचाही काही वेळेला अतिरेक होतो. हेदेखील दुर्लक्षित करता येत नाही. भारताने पुलवामा हल्ल्यानंतर बालकोट या दहशतवाद्यांच्या तळावर हल्ला करून ज्या साहसाचे दर्शन घडवले. त्यातून एक नवा इतिहास निर्माण झाला आहे. याच काळात भारतीय हवाई दलाचा सैनिक अभिनंदन वर्तमान हा पाकिस्तानच्या हद्दीत पडला. आणि त्याला सुखरुपपणे भारतात आणले गेले. अभिनंदनला भारताच्या हवाली करतानाचा देशभर निर्माण झालेला आवेश अतिप्रचंड होता. तो जेव्हा सुखरूपपणे भारतात प्रवेश करीत होता त्याचवेळी पंजाबसह देशाच्या इतर भागातील अनेक सैनिकांचे नातेवाईक आपलाही मुलगा असाच परत येईल का अशा अपेक्षेने व्याकूळ झाले होते. १९७१ च्या पाकिस्तानबरोबरच्या युध्दकाळात जवळपास चौपन्न सैनिकांना युध्दकैदी बनवले गेले होते. यातल्या काही जणांना बेपत्ता म्हणूनही घोषित केले गेले तर काहीजण अजूनही पाकिस्तानच्या कारागृहात युध्दकैदी म्हणून डांबून ठेवले गेले आहेत. अशाच अनेक युध्दकैद्यांच्या कुटुंबियांची व्याकुळतासुध्दा तितक्याच संवेदनशीलतेने समजून घेतली पाहिजे. देशाचे संरक्षण करताना किंवा सैन्यात भरती होण्याचा निर्णय घेताना स्वतःच्या जीवावर या लोकांनी तुळशीपत्र ठेवलेले असते. कोणता प्रसंग केव्हा आणि कसा येईल याची त्यांनादेखील कल्पना नसते. परंतु आज अभिनंदन वर्तमान याची सुटका करण्याकरीता आंतरराष्ट्रीय कायद्याचा वापर केला गेला. जिनीव्हा कराराचा संदर्भ दिला गेला. आणि पाकिस्तानलाही कडक शब्दात इशारा देऊन आपला हा सैनिक सुखरूप परत येईल याची दक्षता घेतली गेली. हा सगळा प्रसंग संपूर्ण देश अनुभवत असताना ज्यांचा मुलगा. कोणाचा पती, असाच परत आणला जाईल का अशा भावनांच्या कल्लोळाने या चौपन्न लोकांचे कुटुंबिय अस्वस्थ झाले होते. म्हणूनच युध्द किंवा संघर्ष होत असतानाच त्यानंतर ते त्याचे संदर्भ किंवा त्याच्याशी निगडीत वेदना कशा त्रासदायक ठरू शकतात हे यानिमित्ताने दिसून येते.

**सरकारी कोडगेपणा**

जर ही वस्तुस्थिती आहे तर या चौपन्न जणांचा शोध घेतला गेला पाहिजे. यातले काही लोक पाकिस्तानात युध्दबंदी असण्याची शक्यता आहे. हे युध्दबंदी परत मिळवण्याकरीता सरकारने आंतरराष्ट्रीय कायद्याचाच आधार घेऊन प्रयत्न करायला हवेत. अभिनंदन याला सुखरुपपणे भारतात आणल्यावर केंद्र सरकारने स्वतःची पाठ थोपटून घेतलेली आहेच आणि जनतेनेदेखील सरकारच्या या प्रयत्नांचे कौतुकही केले आहे. ही गोष्ट भारताची मुत्सद्देगिरी भारताने दाखवलेले आपले सामर्थ्य आणि राजकीय इच्छाशक्ती यातून ही गोष्ट साध्य झाली. मग आता याच गोष्टींचा वापर करून १९७१ पासून आपल्या कुटुंबांपासून दूर असलेल्या सैनिकांचा किंवा त्या युध्दबंदींचा तितक्याच कसोटीने शोध घेतला गेला पाहिजे. किंबहुना त्यांनादेखील अभिनंदनप्रमाणेच सुखरुपपणे परत आणता येईल असे प्रयत्न व्हायला हवेत. अर्थात गेली ४८ वर्षे घरांपासून दूर असलेल्यांपैकी आता किती जणांची अवस्था काय असेल हे सांगता येत नाही. देशाच्या स्वातंत्र्याकरीता अनेक क्रांतीकारकांनी हौतात्म्य पत्करले तर अनेकांना आंदमानच्या काळ्या पाण्याच्या शिक्षेचाही अनुभव घ्यावा लागला परंतु युध्दबंदी असलेल्यांची ही शिक्षा काळ्या पाण्यापेक्षाही भयानक ठरते. यामध्ये तीस लष्करातले आणि चोवीस हवाईदलातले सैनिक असल्याचे सांगितले जाते. वेगवेगळ्या पदांवर असलेले हे चौपन्न सैनिक युध्द काळामध्ये सीमा ओलांडून तिकडे गेले असावेत. आणि त्यांना युध्द बंदी म्हणून पकडले गेले असावे. यापूर्वीसुध्दा १९६५ च्या युध्दात भारतीय हवाई दलाच्या एका सैनिकाला असेच युध्दबंदी बनवले गेले होते. पण चार महिन्यानंतर त्यांचीदेखील सुटका झाली होती. आता जर योग्य तो पाठपुरावा केला तर या युध्दबंदींचीसुध्दा सुटका होऊ शकते.निदान त्यांच्याविषयीची माहिती मिळवता येऊ शकते. या पार्श्वभूमीवर अभिनंदन वर्तमान यांची झालेली सुटका आणि त्याचवेळी चोपन्न सैनिकांच्या कुटुंबियांमध्ये पल्लवित झालेल्या आशा याचा गांभियनि विचार केला पाहिजे.

**वर्तमान आला भूतकाळाचे काय?**

यातला दुर्दैवाचा भाग असा आहे की युध्द थांबल्यानंतर विजयाची जी नशा देशभर असते. ती बराच काळ टिकून राहाते. आणि त्याकाळात प्रत्यक्ष युध्दकाळात घडलेल्या अनेक घटनांकडे दुर्लक्षही होते. ७१च्या युध्दबंदींच्या बाबतीत हाच अनुभव आलेला आहे.युध्दानंतर त्यातल्या सगळ्यांनी सर्व तऱ्हेने आपला माणूस परत यावा म्हणून प्रयत्न केले सरकारकडून केवळ आश्वासने दिली गेली. काहीवेळेला तर या युध्दबंदींच्या नातेवाईकांना मंत्री आणि सरकारी अधिकाऱ्यांकडून नीट वागणुकही मिळाली नाही. लेफ्टनंट किंवा विंग कमांडर अशा पदावर असलेल्या आणि युध्दबंदी झालेल्यांच्या नातेवाईकांनी भारतीय न्यायालयांच्या माध्यमातून थेट आंतरराष्ट्रीय न्यायालयांपर्यंत अर्ज करण्याचा प्रयत्न करून बघितला परंतु त्याचाही उपयोग झाला नाही. चौपन्न युध्दबंदी ही काही लहान संख्या नाही. खरे तर या तीनही दलांनी आपल्या या माणसांना परत मिळवण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी पाठपुरावा करायला हवा होता सरकारमध्ये बसलेल्यांना जागे करायला हवे होते. तेदेखील तितक्या संवेदनशीलतेने होऊ शकलेले नाही असे म्हणण्याची वेळ येते. ४८ वर्षानंतरही आपला माणूस परत यावा यासाठी त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या नातेवाईकांची किती मोठी घालमेल होत असेल याची आपण कल्पना करू शकतो. अभिनंदन वर्तमान याचे स्वागत झाले. हे वर्तमान काळाला शोभेसेच होते. पण भूतकाळातल्या अशाच अनेक अभिनंदनांची काय अवस्था आहे हे स्पष्ट झाले पाहिजे.